# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

**दिनांक ३०/०४/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलिस स्टेशन मौदा ची कारवाई

दिनांक २९/०४/२०२२ रोजी पो.स्टे. मौदा येथील स्टाफ पो.स्टे परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा तारसा शिवार येथील आगरे यांचे शेतातुन एका १० चाकी ट्रक मध्ये विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ तारसा शिवार येथील तारसा ते निमखेडा रोडने लागुन असलेल्या आगरे याचे शेताजवळ गेले असता तेथे एक ट्रक लोड होउन नाल्याचे दिशेने येतांना दिसला. त्यास थांबविण्याचा इशारा केला असता पोलिसांना गणवेशात पाहुन ट्रक चालक याने त्याचे ताब्यातील ट्रक थांबउन जागीच उभा करून अंधाराचा फायदा घेवून पळुन गेला. घटनास्थळीएम. एच.–४०/ बीएल–३७६२ क्रमांकाचा १० चक्का ट्रकमध्ये २० गोवंश कि. २,८५,०००/–रू. जनावरे दोरीने बांधुन क्लेशपणे वागणूक देवून त्यांची कोणत्याही प्रकारची चारापाण्याची व्यवस्था न करता मिळुन आले. त्यापैकी १ गोरा मृत अवस्थेत दिसुन आला. वाहनासह एकुण किंमती २७,८५,०००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. रोशन शिंदे, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११(१)(ड)प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५(अ)९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार संजय देशमुख मो.क्र. ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मौदाचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री हेमंतकुमार खराबे यांचे नेतृत्वात पोलीस नायक रोशन शिंदे, दिपक दरोडे, पोशि रोहीत आडे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर